**मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर अतिक्रमण निर्मुलन कक्ष स्थापन करणेबाबत.**

E-2657295
ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 2913
Date: 22.08.24

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१**
**आदेश क्रं. प्राधि./कक्ष निर्मिती/२०२४/1929/प्र.७**
**दिनांक : 22 AUG 2024**

**संदर्भ -** मुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ यांचे क्र. ६८२ दि.१४.३.२०२४ रोजीची टिप्पणी.

**आदेश-**

अवर सचिव, नगर विकास विभाग यांच्या दि.२३.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई क्षेत्राच्या अभिन्यासातील क्षेत्रासाठी व प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करण्यात आलेले आहे. म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण घोषित केल्यानंतर मुंबई मधील ११४ अभिन्यासातील महाराष्ट्र नगर रचना अधिनियम कायदा अन्वये अतिक्रमण निर्मूलनाची जबाबदारी म्हाडाकडे आलेली आहे.

म्हाडाच्या जमिनीवरील अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी व निष्कासनाची कार्यवाही करण्यासाठी येणा-या अडचणींवर मात करण्यासाठी कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे कार्यक्षेत्रातील वसाहती मधील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे विरोधी कार्यवाही प्रभावीपणे करण्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचा निर्णय प्राधिकरण ठराव क्र.६८३३, दि.२५.०२.२०१९ अन्वये घेण्यात आला आहे.

सदर प्राधिकरण ठराव क्र.६८३३, दि.२५.०२.२०१९ अन्वये अतिक्रमण निर्मूलन कक्ष स्थापन करून सदर कक्षामध्ये उपजिल्हाधिकारी १ यांच्या अधिपत्याखाली २ तहसिलदार, २ नायब तहसिलसदार अथवा ४ उपअभियंता, ८ शाखा/कनिष्ठ /सहायक अभियंता, १ लेखापाल,१ सहायक, २ वरिष्ठ लिपीक,४ कनिष्ठ लिपीक -टंकलेखक, ४ शिपाई, अशा अधिकारी/कर्मचारी वर्गाचा समावेश करून आकृतीबंधामध्ये वाढ करण्याबाबत प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे.

तथापी, उक्त पदांच्या निर्मितीकरीता शासन स्तरावरून मान्यता मिळेपर्यंत सदर कक्ष तात्पुरत्या स्वरूपात कार्यान्वयीत होण्याकरीता सदर कक्षाचा अतिरिक्त कार्यभार खालील नमूद अधिकारी/अभियंत्यांकडे सोपविण्यात येत आहे.

**अतिक्रमण निर्मुलन कक्ष /मुंबई मंडळ**

| अ क्र | अधिका-यांचे नांव, पदनाम व कार्यालय | शेरा |
|---|---|---|
| १ | श्री सागर वीर, उप अभियंता, का.अ./वांद्रे/मुंबई मंडळ | उप अभियंता /अतिक्रमण निर्मुलन कक्ष (पूर्व विभाग) / मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| २ | श्री मण्णाजी वि.माकणे, उप अभियंता का.अ/गोरेगांव/ मुंबई मंडळ | उप अभियंता /अतिक्रमण निर्मुलन कक्ष (पश्चिम विभाग) / मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| ३ | श्री सागर गो.इंगळे, सहा. अभियंता का.अ/कुर्ला/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता/अतिक्रमण निर्मुलन कक्ष (पूर्व विभाग)/मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| ४ | श्री स्वप्निल वि.सोनावणे, कनिष्ठ अभियंता का.अ/शहर/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता/अतिक्रमण निर्मुलन कक्ष (पश्चिम विभाग)/मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री सुरज नाडे, कनिष्ठ अभियंता का.अ/वांद्रे/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता /अतिक्रमण निर्मुलन कक्ष (पूर्व विभाग) /मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| ६ | श्री आकाश आकोलकर, कनिष्ठ अभियंता का.अ/बोरीवली/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता/अतिक्रमण निर्मुलन कक्ष (पश्चिम विभाग)/ मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |

उक्त उप अभियंता व शाखा/कनिष्ठ/सहायक अभियंता हे म्हाडाच्या अभिन्यासातील इमारती /म्हाडा मार्फत बांधण्यात आलेल्या इमाराती अशा प्रकारच्या बांधकामांसाठी (झोपड्या तसेच त्यासारखी अतिक्रमणे वगळून) यांनी अनधिकृत/अतिक्रमणाबाबतची कार्यवाही संबंधित उप अभियंता आणि मिळकत व्यवस्थापक यांचे समवेत समन्वय साधून अतिक्रमण निर्मूलनबाबतच्या प्रकरणाची कार्यवाही विशेष कार्य अधिकारी (एम्पॅनल्ड) तथा अतिक्रमण निर्मुलन कक्ष प्रमुख यांच्या अधिपत्याखाली करावयाची असून सदर कामाकरिता उक्त पदे निर्देशित करण्यात येत आहेत. तसेच झोपड्या तसेच त्यासारखी अतिक्रमणे, मोकळ्या भुखंडावरील अतिक्रमणे व त्यासारखी अतिक्रमणे या संदर्भात कार्यवाही ही संबंधित अभियंता व मिळकत व्यवस्थापक यांनी संयक्त रित्या करावयाची आहे.

अतिक्रमण संबंधित प्राप्त झालेल्या तक्रारी या पद निर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांनी /अभियंत्यांनी समन्वय साधून पुढील प्रमाणे तक्रारींचा निपटारा करावयाचा आहे.

१. मुंबई मंडळांतर्गत प्राप्त होणाऱ्या अतिक्रमण /अधिक्रमणासंबंधित तक्रारी अतिक्रमण निर्मूलन कक्षाकडे वर्ग कराव्यात. तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता विभाग व मिळकत व्यवस्थापक विभाग यांचेकडून स्थळपाहणी अहवाल व मिळकती संदर्भात इतर वस्तुस्थिती अहवाल प्राप्त करून घेण्यात यावा.

२. संबंधित कार्यकारी अभियंता विभागात उपलब्ध अभिलेखाची/लेआऊटची पडताळणी करून अनाधिकृत बांधकामाच्या मोजमापाच्या नकाशासह अतिक्रमित बांधकाम अधोरेखित करून स्वयंस्पष्ट अहवाल अतिक्रमण निर्मूलन कक्षाकडे सादर करतील.

३. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुरु असलेले अनधिकृत बांधकाम तात्काळ थांबविणेकरीता अथवा तोडक कारवाई करण्यासाठी अतिक्रमण कक्षातील पदनिर्देशीत अधिकारी एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ अंतर्गत नोटीस देऊन तद्नुषांगिक सर्व कारवाई पार पाडतील. वसाहतीची क्षेत्रीय माहिती असलेले मिळकत व्यवस्थापक विभागातील संबंधित भाडेवसुलीकार व कार्यकारी अभियंता विभागातील संबंधित कनिष्ठ अभियंता हे कारवाई दरम्यान प्रत्यक्षस्थळी उपस्थित राहतील.

४. या आदेशानुसार अतिक्रमण निर्मूलन कक्षाकरीता कार्यपध्दती निश्चित करण्यात येत असल्याने यापूर्वी मंडळस्तरावर निर्गमित करण्यात आलेले आदेश/ परिपत्रके या द्वारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

५. मुंबई मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता व मिळकत व्यवस्थापन विभागाकडे अनधिकृत बांधकामासंदर्भात प्रलंबित असलेल्या सर्व तक्रारी स्थळपाहणी व इतर आवश्यक अहवालासह अतिक्रमण निर्मूलन कक्षाकडे वर्ग कराव्यात.

६. अतिक्रमण निर्मूलनाच्या अनुषंगाने आवश्यक मनुष्यबळ, कुशल कामगार, वाहन व्यवस्था इ. पुरविण्याचे कामकाज सोपविण्यात आलेल्या एजन्सीकडून मागणीपत्रकाद्वारे करण्यात यावी. त्याबाबतच्या खर्चाची तरतूद मुंबई मंडळाने पुरवणी अर्थसंकल्पाद्वारे करावी. तसेच, पुढील आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद करावी. तसेच, कारवाईत झालेल्या खर्चाची वसुली संबंधित भोगवटाधारक यांचेकडून करणे बंधनकारक राहील.

सदर नवनिर्मित कक्षाकरीता आवश्यक असलेले विभागीय लेखापाल, सहायक, वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक-टंकलेखक व शिपाई या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावयाची आहे.

उपरोक्त नमूद अधिकारी/अभियंत्यांनी नियोजन प्राधिकरण अंतर्गत मिळालेल्या अधिकारानूसार अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी व निष्कासनाची कार्यवाही करण्यासाठी सदर नवनिर्मित कक्षाचे कामकाज **तात्काळ** प्रभावाने सुरू करावयाचे आहे.

सदरहू आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./ प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

22/VIII

**(अनिल वानखडे)**
**सचिव / प्राधिकरण (अ.का)**

**प्रति,**
**(----------------------------------------------)**
**(संबंधित अधिकाऱ्यांना विभाग प्रमुखांमार्फत)**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मुख्यदक्षतावसुरक्षाअधिकारी/प्रा.
२) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ
३) मुख्यअभियंता-१, २, ३/प्रा.
४) वित्तनियंत्रक/प्रा.
५) विधीसल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७) मुख्यवास्तुशास्त्रज्ञ/प्रा
८) सक्षम प्राधिकारी, १-२/प्रा
९) अतिक्रमण निर्मुलन कक्ष /मुं.मं
१०) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष/प्रा (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)
११) मुख्य जनसंपर्कअधिकारी/प्रा.
१२) चौकशी अधिकारी/प्रा

**प्रत -**

१. मुख्य लेखाधिकारी / मुंबई मंडळ
२. लेखाधिकारी / प्रा.
३. प्रशासकीय अधिकारी / प्रा./मुंबई मंडळ
४. कार्यासन अधिकारी / प्रा.

**प्रत माहितीसाठी,**
मा. उपाध्यक्ष / प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
प्रत : प्रशा. ८/९/११/१३/१४/प्रा.